RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784

वर्ष ३ रे | अंक : २२२ वा | शनिवार दि २५ ऑक्टोंबर २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

चार टर्मचा आमदार, बंडानंतर ठाकरेंवर जोरदार प्रहार, शिंदेंचा खंदा शिलेदार राजकारण सोडणार?

वृत्तसंस्था/मुंबई

राज्याचे सामाजिक न्यायमंत्री आणि शिवसेनेचे वरिष्ठ नेते संजय शिरसाट यांनी राजकारणातून निवृत्तीचे संकेत दिले आहेत. वयानुसार कधीतरी थांबायचं का, असा प्रश्न मनात असल्याचं शिरसाट यांनी म्हटलं आहे. शिरसाट यांच्या विधानानं राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरु झाल्या आहेत. शिरसाट छत्रपती संभाजीनगर पश्चिम मतदारसंघातून सलग चारवेळा निवडून आले आहेत. संजय शिरसाट अल्पसंतुष्ट माणूस आहे. मला हे पण पाहिजे, ते पण पाहिजे, अशा प्रकारची भूक मला कधीच नव्हती, पुढेही नसेल, असं मंत्री संजय शिरसाट एका वृत्तवाहिनीशी संवाद साधताना म्हणाले. मी १० वर्षे नगरसेवक राहिलो. त्यानंतर २० वर्षे आमदार आहे. ज्या गोष्टी कधी स्वप्नातही पाहिल्या नव्हत्या, ते सुख मी प्रत्यक्षात उपभोगलं. शेवटी माणसाचं वय त्याला थांबण्यास भाग पाडतं. आपण तिथपर्यंत विचार करायचा नाही. आपण कधीतरी थांबायचं का, असा प्रश्न माझ्या मनात आला. दररोज धावपळ आणि दगदग करण्यापेक्षा कधीतरी थांबायचं का? थांबलं पाहिजे हे ठरवण्याचा प्रयत्न मी करत आहे, अशा शब्दांत शिरसाट यांनी राजकीय निवृत्तीचे संकेत दिले. कोणत्या राजकीय दबावापोटी, कोणी बोलत आहे किंवा वैतागून बोलत आहे, अशातला भाग नाही, ही बाब संजय शिरसाट यांनी स्पष्ट केली. मी आता ६४ वर्षांचा आहे. लवकरच ६५ व्या वर्षात पदार्पण करेन. स्वप्न पाहायला आपण काहीही पाहू शकतो. माझ्याकडे २०२९ पर्यंतचा कालावधी आहे. तोपर्यंत माझ्याकडे आमदारकी आहे. त्यावेळी काय करायला हवं याचा विचार करायलाच हवा ना, असं शिरसाट म्हणाले. राजकारणातून जनसेवेची संधी मिळते. आताच्या घडीला माझ्याकडे असलेलं खातं मोठं आहे. मी चांगलं काम करत आहे. त्यामुळे आणखी काहीतरी पाहिजे किंवा माझ्या काही अपेक्षा आहेत, असाही भाग नाही. माझ्याकडे जे आहे, त्यात मी समाधानी आहे, अशा भावना शिरसाट यांनी व्यक्त केल्या. संजय शिरसाट उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांच्या जवळचे मानले जातात. २०२२ मध्ये एकनाथ शिंदे

यांनी शिवसेनेच्या इतिहासातील सर्वात मोठं बंड केलं. त्या बंडात सुरुवातीपासून त्यांच्यासोबत जे आमदार होते, त्यात शिरसाट यांचा नंबर लागतो. गुवाहाटीत असल्यापासूनच त्यांनी शिंदेंची बाजू ताकदीनं मांडली. जुन्या पक्षप्रमुखांवर ते जोरदार बरसले. उद्धव ठाकरेंवर थेट टीका करणाऱ्या मोजक्या नेत्यांमध्ये त्यांचा समावेश होता.

महाराष्ट्रात गुजरात पॅटर्न? अनेकांना डच्चू देण्याची तयारी; अंतर्गत घडामोडींमुळे धाकधूक वाढली

वृत्तसंस्था/मुंबई

गुजरातनंतर आता महाराष्ट्रात कॅबिनेटमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता आहे. सुमार कामगिरी करणाऱ्या, वादग्रस्त ठरलेल्या अनेक मंत्र्यांना घरचा रस्ता दाखवून त्यांच्या जागी नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाऊ शकते. पुढील वर्षभरात मंत्र्यांच्या कामगिरीचा आढावा घेतला जाईल. त्यांच्या कामाचं मूल्यमापन होईल. त्यामुळे अनेक मंत्र्यांची धाकधूक वाढली आहे. शिंदेसेनेचे अनेक मंत्री वर्षभरात गोत्यात आले आहेत. त्यामुळे त्यांच्यापैकी कोणाकोणाला नारळ मिळणार याची चर्चा आतापासूनच रंगू लागली आहे. राज्यातील महायुती सरकारनं अद्याप वर्ष पूर्ण केलेलं नाही. आम्ही मंत्र्यांना काम करण्यास, स्वत:ला सिद्ध करण्यास पुरेसा वेळ देऊ, अशी माहिती भाजपच्या एका वरिष्ठ नेत्यानं दिली. मिड डेनं याबद्दलचं वृत्त दिलं आहे. दोन किंवा अडीच वर्षांनी मंत्र्यांच्या कामगिरीचा आढावा घेतला जातो. ज्यांना अपेक्षित कामगिरी करता येणार नाही, त्यांना नारळ देण्यात येईल, अशा शब्दांत भाजपच्या वरिष्ठ नेत्यानं पुढील प्लान सांगितला. भाजपनं गेल्याच आठवड्यात गुजरात मधील मंत्रिमंडळात मोठे बदल केले. सरकारमधील सर्वच्या सर्व १६ मंत्र्यांचे राजीनामे घेण्यात आले. केवळ मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांचा राजीनामा घेतला गेला

नाही. यानंतर दुसऱ्याच दिवशी २५ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. यात अनेक नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली. मागील सरकारमधील केवळ ६ जणांना पुन्हा संधी दिली गेली. नव्या मंत्रिमंडळातील १२ जण हे पहिल्या टर्मचे आमदार आहेत. आता हाच गुजरात फॉर्म्युला महाराष्ट्रात लागू होण्याची शक्यता आहे. एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे काही मंत्री वादात सापडले आहेत. त्यांच्या वर्तणुकीमुळे महायुती सरकारची प्रतिमा डागाळली आहे. आतापर्यंत केवळ धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाचा राजीनामा झाला आहे. अन्य वादग्रस्त मंत्र्यांना केवळ समज देण्यात आली आहे. यातील अनेकांना पुढील वर्षभरात डच्चू मिळू शकतो. गेल्या वर्षी राज्यात विधानसभा निवडणूक झाली. ५ डिसेंबरला फडणवीस सरकार अस्तित्वात आलं. सध्याच्या घडीला मंत्रिमंडळात ३९ सदस्य आहेत. यातील ३३ कॅबिनेट, तर ६ राज्यमंत्री आहेत. सर्वाधिक मंत्री भाजपचे आहेत. मंत्रिमंडळात भाजपचे १९, शिंदेसेनेचे ११ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ९ जण आहेत.

संचालकांबाबतची संदिग्धता

संपादकीय लेख

बँकिंग नियमन कायद्यात सुधारणा करीत नागरी सहकारी बँकांच्या संचालकांचा कालावधी सलग १० वर्षे करण्यात आल्यानंतर केंद्र सरकारने २९ जुलै रोजी एका परिपत्रकाद्वारे संबंधित सुधारणा दिनांक १ ऑगस्ट २०२५पासून अंमलात येणार असल्याचे जाहीर केले. या परिपत्रकाने या संदर्भातील संभ्रम अधिकच वाढवला आहे. कारण १० वर्षांचा कालावधी कधीपासून मोजायचा याबाबत स्पष्टता नाही. कायद्यातील हा बदल एक ऑगस्ट २०२५पासून लागू झाला आहे. याचाच अर्थ या दिवशी एखाद्या विशिष्ट संचालकास संचालकपदी राहून सलग १० वर्षे पूर्ण झाली असतील तर एक ऑगस्ट २०२५नंतर होणाऱ्या निवडणुकीसाठी तो अपात्र ठरण्याची शक्यता आहे. कायद्याच्या तरतुदीत सलग १० वर्षे म्हणजेच कोणताही खंड न घेता १० वर्षांचा कालावधी, असा उल्लेख आहे. जर एखाद्या व्यक्तीने नऊ वर्षे झाल्यानंतर राजीनामा दिला, तर तो पुन्हा निवडणुकीसाठी पात्र ठरेल. असे झाल्यास कायद्यामधील या सुधारणेचा हेतूच विफल होईल. एखादी व्यक्ती सलग १० वर्षे संचालक राहिल्यानंतर पाच वर्षांच्या खंडानंतर पुन्हा निवडणुकीसाठी पात्र ठरेल का, या प्रश्नाचे उत्तरही नकारार्थीच द्यावे लागेल. कारण सलग १० वर्षे संचालकपदी राहिलेली व्यक्ती त्यानंतर संचालक होण्यास कधीच पात्र ठरणार नाही, असे कायदा सांगतो. याचा अर्थ एखादा संचालक सलग १० वर्षे संचालक राहिल्यास तो नंतर कायमस्वरूपी अपात्र ठरण्याची शक्यता आहे. बँकिंग नियमन कायद्यातील ही तरतूद बँकेच्या अध्यक्षांना व पूर्ण वेळ संचालकांना लागू केलेली नाही. १० वर्षांचा कालावधी मोजताना त्यांच्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ मोजायचा नाही का? अथवा अध्यक्ष असलेल्या व्यक्तीस ही तरतूद लागू होणार की नाही? ङ्गपूर्ण वेळ संचालकफ ही संकल्पना व्यापारी बँकिंग क्षेत्रातील आहे. तेथे अध्यक्ष अथवा पूर्ण वेळ संचालक हे पगारी असतात. सबब व्यापारी बँकांसाठी करण्यात आलेली ही तरतूद नागरी सहकारी बँकांना लागू करताना त्यामध्ये सहकारी बँकांच्या कार्यपद्धतीनुसार बदल करणे अपेक्षित होते. महाराष्ट्र सरकारने सन १९६९मध्ये राज्याच्या सहकार कायद्यात सुधारणा करून कोणत्याही संचालकास सलग सहा वर्षांपेक्षा अधिक काळ अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष पदावर राहता येणार नाही, अशी तरतूद केली. सन १९८३मध्ये त्यात सुधारणा करून सहा वर्षांचा कालावधी १० वर्षांपर्यंत वाढविण्यात आला. परंतु ङ्गसलगफ या शब्दावर कायदेशीर कीस पाडत अनेक जण १० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच पाच-सहा महिने अगोदर राजीनामा देऊन पुन्हा निवडून, पुन्हा पुढील १० वर्षांची पात्रता धारण करण्याची शक्यता होती. अथवा तशी उदाहरणे घडल्याने राज्य सरकारने १९८६मध्ये सहकार कायद्यात सुधारणा करीत ङ्गसलगफ शब्दाऐवजी ङ्गएकूणफ असा बदल केला. त्यामुळे तुकड्या-तुकड्यांचा कालावधी देखील मोजण्यात येऊ लागला. कायद्यातील पळवाट बंद झाल्याने अनेकांची निराशा झाली आणि सगळ्यांनी एकत्र येऊन २००७मध्ये सहकार कायद्यातून ही १० वर्षांची तरतूदच वगळली! केंद्र सरकारने संबंधित कायद्यात दुरुस्ती करताना महाराष्ट्र सरकारच्या सहकार खात्याचा अनुभव विचारात घेणे आवश्यक होते, असे गमतीने म्हणावेसे वाटते. कारण सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसाठी १९६९मध्ये दहा वर्षांच्या कार्यकाळाबाबत कलम ७३-अ मध्ये दुरुस्ती करताना सहकार खात्याने अनेक शक्यतांचा विचार करून, कायदा वाचताना कोठेही शंकेला वाव मिळणार नाही, याची खबरदारी घेतली होती. १) कलम ७३-अ नंतर खाली दिलेल्या खुलाशात १० वर्षांची मुदत मोजताना सदर कायदा अस्तित्वात येण्यापूर्वीचा कालावधी विचारात घ्यावयाचा नाही, असे स्पष्ट नमूद केले होते. २) कायद्यातील पळवाट शोधून सरकारच्या हेतूला हरताळ फासला जाऊ नये, म्हणून याच कलम ७३-अ च्या खाली खुलासा क्र.२ मध्ये असे नमूद केले होते की, १० वर्षांचा कालावधी संपण्यापूर्वी मागील १२ महिन्यांत पदाधिकाऱ्याने राजीनामा दिल्यास, त्याने १० वर्षांचा कालावधी पूर्ण केला, असे मानण्यात येईल. ३) याच कलमानंतर खुलाशामध्ये असेही स्पष्ट करण्यात आले होते, की अशा व्यक्तीस १० वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर, त्या समितीचा एक कालावधी (सध्या पाच वर्षे) संपेपर्यंत पुन्हा निवडणुकीस उभे राहता येणार नाही. म्हणजे पाच वर्षांच्या खंडानंतर ती व्यक्ती पुन्हा पुढील दहा वर्षांच्या कालावधीसाठी संचालक होऊ शकत होती. बँकिंग नियमन कायद्यामधील नवीन तरतुदींनुसार मात्र संबंधित व्यक्तीने संचालक म्हणून सलग १० वर्षांचा कालावधी एकदा जरी पूर्ण केला तरी त्यास त्या संस्थेवर आयुष्यभरात पुन्हा कधीही संचालक होता येणार नाही. बँकिंग नियमन कायद्यातील नवीन दुरुस्ती वाचताना, त्यामध्ये ङ्गसलग १० वर्षेफ हा उल्लेख केल्याने एक ऑगस्ट २०२५ नंतर होणाऱ्या निवडणुकींद्वारे प्रथम निवडून येणारे संचालक १० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच राजीनामा देतील व थोड्या कालावधीनंतर निवडणुकीद्वारे पुनश्च निवडून येतील व तहहयात संचालक राहू शकतील. परंतु संबंधित कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी, सलग दहा वर्षांचा कालावधी पूर्ण करणाऱ्या संचालकांना एक ऑगस्ट २०२५ नंतर नवीन तरतुदींनुसार त्या संस्थेचे कधीच पदाधिकारी होता येणार नाही. राज्यस्तरीय नागरी सहकारी संस्थांच्या निवडणुकांवर त्या त्या राज्यांत स्थापन झालेल्या निवडणूक प्राधिकरण ांचे नियंत्रण असते. या पार्श्वभूमीवर, रिझर्व्ह बँकेच्या कायद्यातील तरतुदींच्या आधारे स्वत:च्या कायद्यात बदल न करता, निवडणूक प्राधिकरण एखाद्या उमेदवारास अपात्र ठरविण्याचे धाडस करेल? कारण २०२१ नंतर झालेल्या निवडणुकांसाठी बँकिंग नियमन कायद्यात त्या वेळी आठ वर्षांची तरतूद असतानाही राज्य निवडणूक प्राधिकरणाने एकाही उमेदवारास अपात्र ठरविलेले नाही. नागरी सहकारी बँकांच्या निवडणुकीसाठी राज्याच्या सहकार कायद्यात त्या-त्या राज्य सरकारांनी बदल करणे आवश्यक आहे, की बँकिंग नियमन कायद्यातील संबंधित तरतुदीचे पालन करणे सहकार आयुक्तांना बंधनकारक राहील, या संदर्भात स्पष्टता येणे आवश्यक आहे. जर एखाद्या राज्याने संचालकांच्या कालावधीची कायद्यातील तरतूद विचारात न घेता नागरी सहकारी बँकांच्या निवडणुका घेतल्या तर रिझर्व्ह बँक काय करील? ९७व्या घटना दुरुस्तीत सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाचा कालावधी पाच वर्षे नमूद केला आहे. सन २०२०मधील दुरुस्तीनुसार संचालकांचा सलग कालावधी आठ वर्षे करण्यात आला होता. मात्र ९७व्या घटना दुरुस्तीशी जुळवून घेण्यासाठी तो १० वर्षे करण्यात आला. ९७व्या घटना दुरुस्तीमधील कलम २४३ झेड जे (२०) मध्ये प्रत्येक राज्यांने घटनेतील तरतुदींनुसार राज्याच्या कायद्यामध्ये सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेसंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करावीत, असे नमूद करत ही जबाबदारी राज्यांवर सोपवली आहे. तसेच याच कलमातील उपकलम ३५ मध्ये बँकिंग व्यवसाय करणाऱ्या सहकारी संस्थांसाठी बँकिंग नियमन कायद्याच्या तरतुदीसुद्धा लागू होतील, असा स्पष्ट उल्लेख आहे. या सर्वांचा एकत्रित विचार करून राज्य सरकारांनी बँकिंग नियमन कायद्यातील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी योग्य ते निर्णय घेणे आवश्यक आहे.



The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

ठाकरेंसोबत राडा, भाजपनं घेतला धडा; फडणवीस आयती संधी सोडायच्या तयारीत

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. यासाठी सर्वच पक्ष कामाला लागले आहेत. गेल्या काही महिन्यांमध्ये महायुतीमधील तीन पक्षांमध्ये जोरदार इनकमिंग झालं आहे. त्यामुळे अनेक महापालिका, जिल्हा परिषदा, नगर पंचायतींमध्ये भाजप , शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातच जोरदार संघर्ष होण्याची शक्यता आहे. पण मुंबई महापालिका निवडणुकीत महायुती सोबत लढेल, ही बाब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केली आहे. त्यातच आता मुख्यमंत्र्यांनी शिंदेसेनेला दिलासा देणारं आणखी एक सूचक वक्तव्य केलं आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीत भाजप २२७ पैकी १०० हून अधिक जागा जिंकेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. भाजप केवळ संख्याबळाच्या जोरावर महापौर पदावर दावा करणार नाही, असं मुख्यमंत्री म्हणाले. 'जरी आमच्याकडे आकडे असतील, तरीही मी महापौर पदासाठी दावा करणार नाही. महापौर शिंदे यांच्या पक्षातूनही होऊ शकतो,' असं फडणवीस यांनी म्हटलं.२०१७ मध्ये राज्यात भाजप, शिवसेनेचं सरकार होतं. त्यावेळी फडणवीस मुख्यमंत्री होते. मुख्यमंत्री म्हणून ती त्यांची पहिली टर्म होती. त्यावेळी भाजपनं सगळ्या महापालिका स्वबळावर लढवल्या. मुंबईत शिवसेना विरुद्ध भाजप असा संघर्ष पेटला. भाजपच्या नेत्यांनी उद्धव ठाकरेंवर 'वांद्र्याचा माफिया' म्हणत अप्रत्यक्ष हल्ला चढवला. त्यामुळे दोन्ही पक्षात कमालीची कटुता आली. शिवसेनेनं ८४ जागा जिंकत पहिला क्रमांक पटकावला. भाजपनं ८२ जागा जिंकल्या. त्यावेळी ताणले गेलेले संबंध पुढे कायम राहिले.

त्याची परिणिती २०१९ मध्ये शिवसेना भाजपपासून दूर जाऊन महाविकास आघाडी तयार होण्यात झाली.

महाविकास आघाडीच्या प्रयोगामुळे भाजपला सर्वाधिक जागा जिंकूनही विरोधात बसावं लागलं होतं.मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी दिवाळी निमित्त भोजनाचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यावेळी फडणवीस यांनी विविध विषयांवर अनौपचारिक गप्पा मारल्या. 'मुंबई महानगर प्रदेशातील (एमएमआर) ९ पैकी ४ महापालिकांमध्ये भाजप शिवसेनेसोबत युती करुन लढेल. ठाण्यात युतीबद्दलचा निर्णय एकनाथ शिंदे घेतील. तर नवी मुंबईत काय करायचं ते गणेश नाईक बघतील. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये आम्ही राष्ट्रवादी काँग्रेसशी युती करणार नाही. तशी युती झाल्यास शरद पवारांच्या पक्षाला लाभ होण्याची शक्यता आहे,' असं फडणवीस म्हणाले.

मतदारयाद्यांमधील घोळ निस्तरा आणि मगच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या, अशी एकमुखी मागणी विरोधी पक्षांनी केली आहे. त्यासाठी गेल्याच आठवड्यात विरोधी पक्षातील प्रमुख नेत्यांनी निवडणूक आयोगाच्या भेटीगाठी घेऊन निवेदनही दिलं. त्यावरही फडणवीस यांनी भाष्य केलं. विरोधक मागणी करत आहेत. पण त्यांच्याकडे ठोस असं कोणतंही कारण नाही. इलेक्टोरल रोलमधील अनियमतितेचा विषय मांदेखील २०१२ मध्ये उपस्थित केला. पण तो विषय न्यायालयात अद्यापही प्रलंबित असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं.

ठाकरेंच्या एकीचा शिंदेंना डबल फायदा ; भाजप बॅकफूटला, भाईंना २ ठिकाणी जॅकपॉट लागला

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यासाठी सगळ्याच पक्षांनी कंबर कसली आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीला बंपर यश मिळाल्यानंतर तिन्ही पक्षांमध्ये जोरदार इनकमिंग झालं आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी महायुतीमधील तीन पक्षच एकमेकांच्या समोर उभे ठाकण्याची शक्यता आहे. ठाकरे बंधू एकत्र येत असल्यानं महायुतीला काही महापालिकांमध्ये जोरदार लढत द्यावी लागणार आहे. त्यामुळे महायुतीमधील मोठा भाऊ असलेल्या भाजपनं सावध पवित्रा घेतला आहे.

विधानसभा निवडणुकीत पानीपत झाल्यानंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांना युतीची गरज भासू लागली. ठाकरे ब्रँड वाचवण्यासाठी दोघांनी प्रयत्न सुरु केले आहेत. गेल्या तीन महिन्यात त्यांच्या भेटीगाठी वाढल्या आहेत. ठाकरेंची युती झाल्यास त्याचा सर्वाधिक परिणाम मुंबईत दिसेल. मराठी मतं ठाकरेंच्या पाठीमागे उभी राहिल्यास भाजप, शिंदेसेनेसाठी आव्हान सोपं नसेल. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यात तर शिवसेना उबाठा आणि मनसे यांचे एकत्र मोर्चे निघू लागले आहेत. दोन्ही पक्षांचे नेते, कार्यकर्ते युती झालीच असं मानून रस्त्यावर उतरले आहेत. त्यामुळे भाजपनं या दोन्ही ठिकाणी मवाळ भूमिका घेतली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या वर्षा निवासस्थानी दिवाळी निमित्त पत्रकारांशी अनौपचारिक संवाद साधला. त्यावेळी त्यांनी मुंबई महापालिका निवडणुकीत भाजप १०० पेक्षा अधिक जागा जिंकेल, असा विश्वास व्यक्त केला. भाजप केवळ संख्याबळाच्या जोरावर महापौर पदावर दावा करणार नाही, असं मुख्यमंत्री म्हणाले. 'जरी आमच्याकडे आकडे असतील, तरीही मी महापौर पदासाठी दावा करणार नाही. महापौर शिंदे यांच्या पक्षातूनही होऊ शकतो,' असं फडणवीस यांनी म्हटलं. त्यामुळे मुंबईत भाजपनं दोन पावलं मागे घेतली आहेत. शिंदेसेनेचे कमी नगरसेवक निवडून आले तरीही त्यांचा महापौर होऊ शकतो, असे स्पष्ट संकेत फडणवीस यांनी दिले आहेत.

नांदेडमध्ये पवारांच्या उपस्थितीत होणार महत्त्वाचे पक्षप्रवेश

नांदेड : नांदेड जिल्ह्यात मागील काही महिन्यांपासून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीचा विस्तार वाढत चालला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने पक्षात इनकमिंग वाढली असून आता अजित पवार यांनी नांदेडमध्ये काकांच्या पक्षाला खिंडार पाडलं आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात सक्रिय असलेले शिरीष गोरठेकर आणि कैलाश गोरठेकर हे आपल्या शेकडो समर्थकासह उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत शनिवारी राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत. ऐन निवडणुकीच्या तोंडावर नांदेडमध्ये हा शरद पवारांना मोठा धक्का मानला जात आहे. तर या पक्षप्रवेशामुळे उमरी तालुक्यात अजित पवारांच्या पक्षाला बळ मिळणार असल्याचं बोललं जात आहे. उमरी आणि देगलूर तालुक्यातील पदाधिकाऱ्यांचा हा प्रवेश सोहळा पार पडणार आहे.शिरीष गोरठेकर आणि कैलाश गोरठेकर हे माजी आमदार दिवंगत बापूसाहेब गोरठेकर यांचे सुपुत्र आहेत. नांदेड जिल्ह्याच्या राजकारणात गोरठेकर कुटुंबाचं नाव मोठं असून अनेक दशकापासून राजकीय वर्चस्व राहिलं आहे. दिवंगत बापूसाहेब गोरठेकर यांनी भोकर विधानसभा मतदार संघातून प्रतिनिधित्व केले. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचे कट्टर विरोधक अशी बापूसाहेब गोरठेकर यांची ओळख होती. गोरठेकर परिवारातील तिसरी पिढीत शिरीष गोरठेकर हे उमरी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तर कैलाश गोरठेकर हे नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक आहेत. दोन्ही गोरठेकर बंधू आता शरद पवार यांची सोडणार असून अजित पवार यांच्या पक्षात प्रवेश करणार आहेत. शनिवारी उपमुख्यमंत्री पवार यांच्या उपस्थितीत ते राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत.

विरोधकांच्या एकीमुळे भाजप एकाकी; लक्षवेधी लढतीत महाशक्तीला रोखलं; ऐतिहासिक निर्णयानंतरचा पहिला विजय

श्रीनगर : जम्मू काश्मीरच्या राज्यसभेच्या चार जागांसाठी झालेल्या निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आहेत. चारपैकी तीन जागा जिंकत सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्सनं ताकद दाखवली आहे. तर भाजप ला एका जागेवर यश मिळालं आहे. जम्मू काश्मीरमध्ये भाजप प्रमुख विरोधी पक्ष आहे.

जम्मू काश्मीरला असलेला विशेष राज्याचा दर्जा २०१८ मध्ये रद्द करण्यात आला. यानंतर दोन केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती झाली. जम्मू-काश्मीर आणि लडाख हे दोन केंद्रशासित प्रदेश म्हणून घोषित करण्यात आले. यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये प्रथमच राज्यसभेची निवडणूक झाली. या ऐतिहासिक

निवडणुकीत भाजप विरोधक एकवटले. त्यामुळे भाजपला केवळ एक जागा जिंकता आली. राज्यात सत्ताधारी असलेल्या नॅशनल कॉन्फरन्सनं तीन जागा खिशात घातल्या. काँग्रेस , पीडीपीनं नॅशनल कॉन्फरन्सला साथ दिली. त्यामुळे तिसरी जागा जिंकण्यासाठी पुरेसं संख्याबळ नसतानाही नॅशनल कॉन्फरन्सचा तिसरा उमेदवार विजयी झाला.नॅशनल कॉन्फरन्सचे चौधरी मोहम्मद रमजान, सज्जाद अहमद किचलू आणि शमी ओबेरॉय यांनी विजय मिळवला. तर भाजपच्या सत शर्मा यांनी बाजी मारली. त्यांना ३२ मतं मिळाली. सत शर्मा जम्मू काश्मीर भाजपचे अध्यक्ष आहेत. नॅशनल कॉन्फरन्सच्या चौधरी मोहम्मद रमजान यांच्या समोर भाजपच्या अली मोहम्मद मीर यांचं आव्हान होतं. मीर यांचा पराभव झाला. दुसऱ्या जागेसाठी एनसीचे सज्जाद अहमद किचलू आणि भाजपचे राकेश महाजन आमनेसामने होते. इथे महाजन पराभूत झाले. फारुख अब्दुल्ला आणि उमर अब्दुल्ला विजयी उमेदवारांच्या अभिनंदनासाठी जम्मू काश्मीर विधानसभेत पोहोचले.जम्मू-काश्मीरच्या विधानसभेत एनसी सर्वात मोठा पक्ष आहे. त्यांच्या आमदारांची संख्या ४२ इतकी आहे.

तर भाजपच्या आमदारांची संख्या २९ इतकी आहे. एका उमेदवाराच्या विजयासाठी १९ मतं गरजेची होती. हा कोटा लक्षात घेता एनसीचे २ उमेदवार विजयी होऊ शकत होते. पण काँग्रेस, पीडीपीसह भाजप विरोधकांनी एनसीला साथ दिली. त्यामुळे एनसीचे तीन उमेदवार विजयी झाले. विरोधकांची एकी झाल्यानं भाजपला एका जागेवर समाधान मानावं लागलं.

महिला डॉक्टर बीडची असल्यानं वरिष्ठांनी तक्रार डावलली असेल तर गंभीर..

बीड : साताऱ्यातील महिला डॉक्टरच्या आत्महत्येनंतर आता आरोग्य आणि पोलीस व्यवस्थेविरोधात अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. वरिष्ठांच्या दबावामुळे आणि पोलीस अधिकाऱ्याने केलेल्या अत्याचारामुळे फलटणमधील उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरने आत्महत्या केली. या प्रकरणी तिने पोलीस उप-अधीक्षकांकडेही तक्रार नोंदवल्याची माहिती समोर आली आहे. त्यावरूनच आता राज्याचे माजी मंत्री यांनी एसआयटी चौकशीची मागणी केली आहे.सातारा जिल्ह्यातील फलटण येथे रुग्णसेवेत असलेल्या व मूळच्या बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील महिला डॉक्टर यांच्याबाबत घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. माझ्या त्या डॉक्टर भगिनीला

भावपूर्ण श्रद्धांजली. तिच्या अकाली निधनाने कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात मी सहभागी आहे. या घटनेतील दोषींना कठोर शासन व्हावे, तसेच ती बीडची आहे म्हणून तिने केलेल्या तक्रारी वरिष्ठांनी डावलल्या असतील तर हे अतिशय गंभीर आहे. या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र एसआयटी नेमून चौकशी करण्यात यावी तसेच हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालवले जावे व दोषींना कडक शासन व्हावे, याबाबत उद्या राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांना पत्र देणार आहे'.साताऱ्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरने जीव दिल्याने एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणात आता या महिला डॉक्टरच्या जीव देण्यामागील धक्कादायक कारण पुढे आलं आहे. महिला डॉक्टरने जीव देण्यापूर्वी आपल्या हातावर एक सुसाईड नोट लिहून ठेवली होती. यामध्ये तिने आयुष्याची अखेर करण्याचं कारण आणि त्यासाठी जबाबदार असणाऱ्यांची नावं लिहून ठेवली आहे. त्यामुळे या प्रकरणाला वेगळं वळण आलं आहे.महिला डॉक्टरने आपल्या आयुष्याची अखेर करण्यापूर्वी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये तिच्यावर अत्याचार आणि मानसिक छळ झाल्याचा आरोप केला आहे. याप्रकरणी तिने दोन पोलिसांचं नावही लिहिलं आहे. माझ्यावर अत्याचार झाला, असा मजकूर या मृत महिला डॉक्टरच्या हातावर लिहिलेला आढळून आला आहे. त्याशिवाय तिच्या हातावर पोलीस निरीक्षक गोपाल बदने यांचं नाव लिहिलेलं आहे.माझ्या मरण्याचं कारण पोलीस निरीक्षक गोपाल बदने असून त्याने माझ्यावर चारवेळा अत्याचार केल्याचं या महिला डॉक्टरने आपल्या हातावर लिहिलं आहे. त्याशिवाय प्रसाद बनकरने मानसिक आणि शारीरिक त्रास दिल्याचंही लिहिलेलं आहे. या धक्कादायक माहितीनंतर आरोग्य विभाग आणि पोलीस विभागात एकच खळबळ माजली आहे.

सिंधुदुर्गात झुडुपात बेवारस कार, नंबरप्लेट गायब, अन आतमध्ये...

सिंधुदुर्ग : सिंधुदुर्ग जिल्ह्यात यापूर्वी एक दोन - मोठे गंभीर स्वरूपाचे गुन्हे प्रकरण उघडकीस आले असतानाच आता एक रक्ताने माखलेली कार दोडामार्ग पोलिसांना सापडली आहे. या कारची नंबर प्लेटही गायब आहे, त्यामुळे हा घातपात आहे की अपघात, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. या प्रकरणाचे गूढ वाढले आहे. पोलिसांनाही याप्रकरणात वेगळ्यात गुन्ह्याचा संशय असून पोलिसांकडून या सगळ्याची माहिती घेतली जात आहे, अशी माहिती आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात दोडावर तालुक्यातील तिलारी मुख्य पुलानजीक एक रक्ताने माखलेली कार सापडल्याने मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे या कारची नंबर प्लेटही गायब आहे. त्यामुळे या सगळ्या घटनेने पोलिसांचा संशय बळावला आहे. स्थानिकांनी पोलिसांना या घटनेची माहिती दिली. अशी रक्ताने माखलेली बेवारस कार सापडली असल्याचे कळताच तातडीने दोडामार्ग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. गुरुवारी (२४ ऑक्टोबर) सकाळी काही स्थानिक नागरिकांना धरणाच्या मुख्य पुलाजवळ ही कार दिसून आली. इतक्या अडचणीच्या ठिकाणी ही कार कशी पोहोचली, असा प्रश्न त्यांना पडला. ही कार रक्ताने माखलेली होती. त्यामुळे स्थानिकांनी या सगळ्याची माहिती तात्काळ पोलिसांना दिली. पोलिसांकडून या चार चाकी वाहनाची तपासणी करण्यात आली, त्यावेळी या कारमध्ये रक्ताचे डाग दिसून आले, त्यामुळे हे प्रकरण नेमकं काय आहे, याचं गूढ वाढलं आहे.सध्या पोलिसांनी कार ताब्यात घेतली असून या प्रकरणाचा तपास सुरू केला आह. सध्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचं काम सुरू आहे. नंबर प्लेट गायब असल्याने वाहनाच्या मालकाबाबत काहीही कळालेलं नाही. या वाहनाचा मालक कोण, नेमकं काय घडलं या सगळ्याचा शोध पोलिसांनी सुरू केला आहे.

पुण्यात अल्पवयीन मुलीचा विनयभंग

पुणे : अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचारांच्या घटना वाढत असल्याचं गंभीर चित्र समोर येत आहे. पुण्यातील काळेपडळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीचा ३९ वर्षीय नराधमाने विनयभंग केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी काळेपडळ पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. आरोपीचं नाव बाळासाहेब पंढरी अंबुरे (वय ३९) असं आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलीची आई ही या प्रकरणात फिर्यादी आहे. आरोपी हा तिच्या ओळखीचा असून, तो नेहमी त्यांच्या घरी ये-जा करत असे. पीडित मुलीचे वडील हयात नसल्याचा फायदा घेत आरोपी दोन दिवसांपूर्वी पीडितेच्या घरी आला. त्यावेळी ती घरात एकटी होती. आरोपीने तिच्या छातीवर आणि नको त्या अवयवांवर हात फिरवून विनयभंग केला. हा प्रकार मुलीने आईला सांगितल्यानंतर आईने आरोपीला जाब विचारला होता.

दहा दिवसांपूर्वी ब्रेकअप, भेटायला बोलवून 'एक्स'वर हल्ला

मुंबई : मुंबईच्या काळाचौकी परिसरात एक धक्कादायक घटना घडली आहे. येथे एका तरुणाने २४ वर्षीय तरुणीवर जीवघेणा हल्ला केला आहे. इतकंच नाही तर तरुणीवर हल्ला केल्यानंतर त्याने स्वत:च्या आयुष्याची अखेर केली आहे. हल्ला करणारा तरुण हा त्या तरुणीचा एक्स बॉयफ्रेंड होताय त्याचं नाव सोनू बराय असल्याची माहिती आहे. त्याने दिवसाढवळ्या या तरुणीवर क्रूर हल्ला केला. त्यानंतर त्याने स्वतःचे जीवन संपवले

लालबाग काळाचौकी परिसरात सकाळच्या सुमारास ही धक्कादायक घटना घडली आहे. या तरुणाने तरुणीला रस्त्यात बेदम मारहाण केली, त्यानंतर तिच्यावर चाकूने हल्ला केला. त्यानंतर ही तरुणी स्वतःचा बचाव करण्यासाठी जवळ असलेल्या आस्था नर्सिंग होममध्ये शिरली. तरुणाने नर्सिंग होममध्ये घुसून तिच्यावर जीवघेणा हल्ला केला आणि नंतर स्वतःचा गळा चिरला. या घटनेनंतर या दोघांना तात्काळ केईएम रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. काळाचौकी पोलिस आणि उपायुक्त घटनास्थळी पोहोचले असून प्रकरणाची माहिती घेत आहे. या प्रकरणात हल्ला झालेल्या तरुणीची प्रकृती चिंताजनक असल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे.आंबेवाडी येथे राहणारा सोनू बराय (२४) याचे याच परिसरात राहणाऱ्या पीडित तरूणीसोबत प्रेमसंबंध होते.

आठ दिवसांपूर्वी प्रेयसीचे अन्य कुणासोबत अफेयर असल्याचा संशयावरून दोघांमध्ये ब्रेकअप झाले होते. तेव्हापासून सोनू मानसिक तणावात होता. शुक्रवारी सकाळी त्याने पीडित तरुणीला भेटायला बोलावलं. त्यानंतर त्याने तिला मारहाण केली आणि मग तिच्यावर चाकूने वार केले. त्यानंतर स्वतःचा गळा चिरून घेतला. सोनू याचा मृत्यू झाला असून तरूणीवर जे जे रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहीती पोलिस उपायुक्त आर. रागसुधा यांनी दिली.

प्रेमसंबंधामुळे महिलेला संपवलं, पुरावा लपविण्यासाठी ब्लँकेटमध्ये गुंडाळलं

पुणे (इंदापूर) : पुण्यातील इंदापूर तालुक्यातील भिगवण पोलीस स्टेशन हद्दीतील मदनवाडी गावाजवळ ओढ्याच्या पुलाखाली काही दिवसांपूर्वी एका गरोदर महिलेचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह सापडल्यानं खळबळ उडाली होती. अखेर या घटनेचा थरारक उलगडा झाला असून, मृत महिलेचा खून तिच्याच पतीने केला असल्याचं पोलीस तपासात उघड झालं आहे.

पोलीस तपासानुसार, दिपाली सुदर्शन जाधव (वय ३०, रा. कटफळ, ता. बारामती) हिचा विवाहबाह्य प्रेमसंबंध असल्याचा संशय तिच्या पतीला होता. त्यावरून १२ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी घरगुती वाद वाढत गेला आणि रागात आरोपी पती सुदर्शन ऊर्फ रविराज रणजित जाधव (वय ३६) याने पत्नीच्या डोक्यात लोखंडी वस्तूने प्राणघातक हल्ला करून तिचा खून केला. खून केल्यानंतर पुरावा लपविण्यासाठी आरोपीने पत्नीचा मृतदेह ब्लँकेटमध्ये गुंडाळून त्याच्या ज्युपिटर दुचाकीवर ठेवला आणि तो मृतदेह भिगवण-बारामती रस्त्यावरील मदनवाडी गावाजवळील ओढ्याच्या पुलाखाली फेकून दिला.२२ ऑक्टोबर रोजी स्थानिक पोलीस पाटील नानासाहेब वणवे यांनी पुलाखाली ब्लँकेटमध्ये बांधलेला मृतदेह आढळल्याची माहिती पोलिसांना दिली. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत होता आणि डोक्याची कवटी फुटलेली होती. मात्र, हातावर 'ठर्रीळीरक्ष' असं गोंदण असल्यानं पोलिसांनी त्यावरून ओळख पटवली. भिगवण पोलीस स्टेशन आणि पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने संयुक्त तपास सुरू केला. तपासादरम्यान सुदर्शन जाधव याने पत्नी बेपत्ता असल्याची तक्रार १२ ऑक्टोबर रोजी बारामती पोलीस स्टेशनला दिली होती. परंतु चौकशीत त्याच्या उत्तरात विसंगती आढळल्यानं पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली. शेवटी सुदर्शनने पत्नीचा खून केल्याची कबुली दिली.

आरोपी सुदर्शन ऊर्फ रविराज रणजित जाधव याला अटक करून न्यायालयात हजर केले असता, ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. ही कारवाई विशेष पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी (कोल्हापूर परिक्षेत्र) यांच्या मार्गदर्शनाखाली, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी मधुकर भट्टे यांच्या सूचनेनुसार पार पाडण्यात आली. या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, भिगवण पो.स्टे.चे स.पो.नि. विनोद महांगडे, तसेच इतर अंमलदारांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

कबड्डी खेळाचा किंग भारत!

आशियाई युवा क्रीडा स्पर्धेत मुला-मुलींचे दुहेरी सुवर्ण

मनमा (बहारीन) : बहारीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धा २०२५ मध्ये भारताने कबड्डीम ध्ये आपला दबदबा सिद्ध करत दुहेरी सुवर्णपदक जिंकले. मुलांच्या आणि मुलींच्या दोन्ही कबड्डी संघांनी अंतिम सामन्यात इराणचा पराभव करून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

मुलांच्या अंतिम सामन्यात भारताला इराणने जोरदार प्रतिकार केला. मात्र, एका रोमहर्षक सामन्यात भारताने ३५-३२ अशा फरकाने इराणचा पराभव करून सुवर्णपदक मिळवले. यापूर्वी, मुलांच्या संघाने बांगला देश, श्रीलंका, पाकिस्तान, इराण, बहारीन आणि थायलंडविरुद्ध विजय नोंदवत अपराजित राहण्याचा विक्रम कायम ठेवला.

मुलींच्या संघाने मात्र अंतिम साम न्यात ७५-२१ अशा मोठ्या फरकाने इराणचा धुव्वा उडवत एकतर्फी विजय मिळवला आणि सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले. मुलींच्या संघानेही साखळी फेरीत बांगला देश, थायलंड, श्रीलंका आणि इराणविरुद्ध विजय मिळवत अव्वल स्थान राखले होते.

कबड्डीच्या सुवर्णपदकांनी भारताच्या एकूण पदकतालिकेला मोठी चालना दिली. तायक्वाँदोमध्ये देबासीश दास (मुलांची वैयक्तिक पुमसे) आणि यशविनी सिंग व शिवांशू पटेल (मिश्र जोडी पुमसे) यांनी उपांत्य फेरीत पराभूत झाल्यानंतर कांस्यपदके जिंकली. या स्पर्धेत भारताच्या एकूण पदकांची संख्या १० वर पोहोचली आहे, ज्यात २ सुवर्ण, ३ रौप्य आणि ५ कांस्यपदकांचा समावेश आहे. या स्पर्धेत २२२ सदस्यीय भारतीय पथक सहभागी झाले आहे. स्पर्धेचा समारोप ३१ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

विराट-रोहितचा ऑस्ट्रेलियातील शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना?

येओसू (कोरिया) : सिडनी : भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील शेवटचा सामना आज शनिवारी सिडनीत होणार आहे. या मालिकेतील पहिले दोन सामने टीम इंडियाने गमावले आहेत. यामध्ये विराट कोहली, रोहित शर्मा प्रभाव टाकू शकले नाहीत. आजचा हा सामना या दोघांसाठी शेवटचा एकदिवसीय सामना असू शकतो. तसेच, या दोघांचा शेवटचा ऑस्ट्रेलिया दौराही असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

विराट आणि रोहित यांनी याअधीच कसोटी आणि टी-२० क्रिकेटमधून याआधीच निवृत्ती स्वीकारली आहे. टीम इंडिया पुढील दोन वर्षांत ऑस्ट्रेलियाचा दौरा करणार नाही. त्यामुळे विराट आणि रोहितचा आजचा सामना आणि हा दौरा कांगारूंच्या देशातील अर्थात ऑस्ट्रेलियाचा शेवटचा दौरा ठरण्याची



शक्यता आहे. दरम्यान, ऑस्ट्रेलियाविरुद्ध शनिवारी होणाऱ्या शेवटच्या एकदिवसीय सामन्यात टीम इंडियासाठी 'करो वा मरो'सारखी स्थिती आहे. पहिले दोन साम ने गमावल्यानंतर आता किमान तिसरा सामना जिंकून 'क्लीन स्विप' टाळ्याचे आव्हान टीम इंडियासमोर असणार आहे. विशेष म्हणजे, एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात ऑस्ट्रेलियाने भारताविरुद्ध कधीही 'क्लीन स्विप' केलेली नाही. हा ऐतिहासिक पराभव टाळण्यासाठी कर्णधार शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाला 'करो वा मरो'ची काम गिरी करावी लागेल.

पाकची ज्यु.हॉकी विश्वचषकातून माघार

भारतात खेळण्यास नकार

चेन्नई : : भारत आणि पाकिस्तानमधील बिघडलेल्या क्रीडा संबंधांमुळे पाकिस्तानने येत्या नोव्हेंबर-डिसेंबर (२०२५) मध्ये भारतात होणाया पुरुष ज्युनिअर हॉकी विश्वचषक स्पर्धेतून म ाघार घेतली आहे. आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाने (एफआयएच) शुक्रवारी या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

अलीकडील दहशतवादी हल्ले आणि त्यानंतर भारत-पाकिस्तानमधील बिघडलेले संबंध. भारताचे नवीन धोरण ज्यामुळे द्विपक्षीय (बायलॅटरल) क्रीडा स्पर्धांवर निर्बंध आले आहेत. या पार्श्वभूमीवर पाकिस्तान हॉकी महासंघाने (पीएचएफ) खेळाडूंच्या सुरक्षेचे कारण देत माघार घेतली आहे. पहलगाम येथे २२ एप्रिलला झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानने भारतीय स्पर्धेतून माघार घेण्याची ही दुसरी वेळ आहे. यापूर्वी ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये बिहारमधील राजगीर येथे झालेल्या पुरुषांच्या आशिया कप हॉकी स्पर्धेतूनही पाकिस्तानने माघार घेतली होती.

मोठ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा चुकवू नये, यासाठी पाकिस्तान हॉकी महासंघ (पीएचएफ) आता स्पर्धेसाठी तटस्थ ठिकाण (न्यूट्रल वेन्यू) मिळावे, यासाठी आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाकडे (एफएचआय) मागणी करत आहे.

ज्युनिअर हॉकी विश्वचषक स्पर्धा २८ नोव्हेंबर ते २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत चेन्नई आणि मदुराई येथे होणार आहे. स्पर्धेत पाकिस्तानला भारत, चिली आणि

स्वीत्झर्लंडसह 'ब' गटात आहेत. या स्पर्धेतून पाकिस्तान माघार घेतल्यामुळे आता त्यांच्या जागी कोणत्या संघाचा समावेश करण्यात येणार याबाबतची घोषणा लवकरच केली जाईल. भारताने पाकिस्तानसोबत द्विपक्षीय सामने न खेळण्याचे धोरण ठेवले असले, तरी बहुराष्ट्रीय (बायलॅटरलत) स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची परवानगी दिली आहे, असे असूनही पाकिस्तानने म ाघार घेतल्याने दोन्ही देशांतील क्रीडा संबंध अधिक तणावाचे बनले आहेत.

शौर्या अंबुरेला १०० मीटर अडथळा शर्यतीत रौप्यपदक

रिफा (बहारीन) : भारताची १६ वर्षीय धावपटू शौर्या अंबुरे (महाराष्ट्र) हिने येथे सुरू असलेल्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धा २०२५ मध्ये १०० मीटर अडथळा शर्यतीत रौप्यपदक जिंकून आपला २०२५ चा उत्कृष्ट फॉर्म कायम राखला आहे. अंतिम फेरीत तिने १३.७३ सेकंद अशी वैयक्तिक सर्वोत्तम वेळ नोंदवत मोठी कामगिरी केली. दरम्यान, शुक्रवारी भारताने या स्पर्धेत ट्रॅक आणि फिल्डमध्ये तीन पदके जिंकली. यामध्ये शौर्य अंबुरेसह पलाश मंडल आणि जस्मिन कौर यांचा समावेश आहे.

शौर्यासाठी हे रौप्यपदक खूप महत्त्वाचे ठरले. कारण, यंदाच्या हंगामातील हे तिचे तिसरे मोठे आंतरराष्ट्रीय पदक आहे. यापूर्वी तिने भुवनेश्वर येथील राष्ट्रीय ज्युनियर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकले होते. आशियाई १८ वयोगटाच्या चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक मिळवले होते. आशियाई स्पर्धा सुरू होण्यापूर्वी तिची हीटमधील वेळ १४.०० सेकंद होती. परंतु, अंतिम फेरीत तिने १३.७३ सेकंदांपर्यंत सुधारणा केली, जी तिचा दबावाखाली सर्वोत्तम कामगिरी करण्याचा आत्मविश्वास दाखविते.

भारताच्या पलाश मंडलने ५००० मीटर चालण्याच्या शर्यतीत २४ मिनिटे ४८.९२ सेकंद (२४:४८.९२) वेळेची नोंद करत कांस्यपदक मिळविले. चीनच्या खेळाडूंनी या शर्यतीत वर्चस्व राखले. हाओझे झांगने २१:४३.८२ सेकंद वेळेसह सुवर्णपदक जिंकले, तर यूजी लू याने २२:२८.६४ सेकंद वेळेसह रौप्यपदक पटकावले. दरम्यान, भारताच्या जस्मिन कौरने महिलांच्या गोळाफेक प्रकारात कांस्यपदक संपादन केले. तिने १४.८६ मीटर गोळाफेक केली. तिची सहकारी जॉय बैदवान १४.५३ मीटरसह सहाव्या स्थानावर राहिली.

महिला ४०० मीटर हीट: एडविना जेसन (५५.७१ सेकंद) आणि तन्नू (५७.५४ सेकंद) या दोघींनी उपांत्य फेरीसाठी पात्रता मिळवली. पुरुष ४०० मीटर हीट : रामू लोंडगे याने ४९.६२ सेकंदाची वैयक्तिक सर्वोत्तम वेळ नोंदवून उपांत्य फ ेरीत प्रवेश केला. पुरुष १०० मीटर हीट : दिव्यांश राज (११.०१ सेकंद) आणि निखिल कमल (११.१६ सेकंद) यांनी पुढील फेरी गाठली. मात्र, उपांत्य फेरीत ते बाहेर पडले.

चाळीतलं घर ते 2BHK घराची स्वप्नपूर्ती!

नव्या घराविषयी बोलताना भारावली प्रियांका तेंडोलकर

मुंबई : अभिनेत्री प्रियांका तेंडोलकर मराठी टेलिव्हिजन विश्वातील एक लोकप्रिय अभिनेत्री आहे. सध्या 'ठरलं तर मग' मालिकेतील तिच्या प्रिया या भूमिकेने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य केले आहे. प्रिया जरी नायिकेच्या नाकीनऊ आणणारी खलनायिका असली तरीही प्रेक्षक तिचं काम एन्जॉय करतात. या प्रियाने वैयक्तिक आयुष्यात नुकताच एक मोठा टप्पा पार केला आणि तो म्हणजे स्वत:च्या घराची स्वप्नपूर्ती! प्रियांकाने तिच्या आई-बाबांसह मिळून २इकघ घर खरेदी केले. अलिकडेच या नव्या घराविषयी बोलताना ती खूपच भारावली होती.

प्रियांका तेंडोलकर म्हणाली, 'ते घर आई-बाबांचं आणि माझं आहे. आम्ही तिघांनी मिळून हे घर घेतलं, ज्यामध्ये तिघांनीही बरोबरीने पैसा गुंतवला आहे. हा संसार कायम तिघांचा होता आणि तिघांचाच असणार आहे. तिघांच्या संसारातील हे छोटसं बाळ आहे, असं आपण म्हणूया. माझा जन्म चाळीत झालाय, त्यानंतर मग आम्ही १ठघ मध्ये राहत होतो, त्यानंतर १इकघ मध्येही राहिलो. मात्र, माझ्या आई-

बाबांचं स्वप्न होतं की 2BHK घर घ्यायला हवा. महाराजांच्या आणि स्वामींच्या कृपेने नवीन घर घेणं शक्य झालं. ते त्यांचच घर आहे, आम्ही त्यात राहतो.' एका मुलाखतीत प्रियांका बोलत होती.

दरम्यान प्रियाने असेही सांगितले की, तिच्या आईचा आणि तिचा इंटिरिअर डिझाइनचा व्यवसाय आहे. त्यामुळे नवीन घर कसं सजवायचं आणि कुठे काय ठेवायचं, हे स्वप्न त्यांनी आधीच पाहिलं होतं. इंटिरिअर करताना ती सगळी स्वप्न पूर्ण केल्याचं प्रियांकाने सांगितलं. प्रियांका म्हणाली की, 'आम्हाला जितकं झेपेल, परवडेल आणि जे आमच्या सोयीचं असेल असं आमचं ते घर आहे.' प्रियांकाने असेही म्हटले की, त्यांचं घर मोठं होत असताना त्यांनी घरातील देव्हाराही पूर्वीच्या घरापेक्षा मोठा केला आहे. तसेच गेली अनेक वर्ष प्रियाच्या घरी शेगांवच्या गजानन महाराजांची पालखी येते, यंदा नवव्या वर्षी नव्या घरात ही पालखी आली. काही दिवसांपूर्वी अभिनेत्रीने या पालखीनिमित्ताने शेअर केलेल्या काही फोटोंमध्येही तिच्या या नव्या घराची आणि खास बनवून घेतलेल्या देव्हाऱ्याची झलक पाहायला मिळाली.

कॅन्सरशी झुंज देणाऱ्या दीपिका कक्करने सांगितली भयंकर परिस्थिती

मुंबई : अभिनेत्री दीपिका कक्कर सध्या कॅन्सरची ट्रीटमेंट घेते आहे. यासंबंधी आणि तिच्या दैनंदिन आयुष्यातील अनेक गोष्टी या व्लॉगवर ती शेयरही करत असते. नुकताच तिने दिवाळी सेलिब्रेशनचा व्लॉग शेयर केला. यादरम्यान तिने सेलिब्रेशनसहित सध्या तिच्या ट्रीटमेंटबाबतची अपडेटही चाहत्यांना दिली.

यामध्ये दीपिका सांगते की काही केसेसमध्ये लिव्हर कॅन्सरसाठी टार्गेट थेरेपी घेतल्यानंतर अनेकांचे केस जातात. यामध्ये तिलाही ट्रीटमेंटच्या गंभीर दुष्परिणामांचा सामना करावा लागतो आहे. यामुळे तिचे केस गळत आहेत. तिने या त्रासापासून सुटका करून घेण्यासाठी हेअर पॅच वापरण्याचा निर्णय घेतल्याचेही सांगितले.दीपिका पुढे म्हणते माझ्या डॉक्टरने मला

सांगितले की टार्गेटेड थेरपीमध्ये फार कमी लोकांचे केस गळतात. पण माझ्या केसांकडे तुम्ही नीट पाहिले तर लक्षात येईल की माझे किती केस गळत आहेत. मी आता हेअर पॅच मागवले आहेत. या सगळ्यात मला थायरॉईडचा त्रास होतो आहे. त्यात मला हार्मोनल असंतुलनाचा त्रास होतो आहे. मी तुम्हाला परत परत सांगू इच्छिते की आरोग्य ही सगळ्यात महत्त्वाची गोष्ट आहे. करियरवर लक्ष देणे गरजेचे आहेच. पण त्या ही पेक्षा महत्वाचे आहे आरोग्याची काळजी घेणे आणि आपल्या जीवलगांसोबत वेळ घालवा. मला जवळपास अडीच वर्षे ही औषधे घ्यायची आहेत. मला याबाबत काहीच अडचण नाही. मी यातून बरी होईन याची मला खात्री आहे.

आम्ही वेगळे झालो, खूप वाईट टप्पा.. भीती वाटत होती

'नवरी मिळे हिटलरला' फेम अभिनेत्रीचं मोडलं लग्न; कठीण काळाविषयी म्हणाली..

मुंबई : अभिनेत्री भूमिजा पाटील मराठी मनोरंजन विश्वातील एक लोकप्रिय चेहरा आहे. ती 'नवरी मिळे हिटलरला' या मालिकेतून घराघरात पोहोचली. शिवाय सोशल मीडियावरही भूमिजाचा मोठा चाहतावर्ग आहे. परिणामी भूमिजाचं वैयक्तिक आयुष्याचीही चर्चा होते. अलिकडेच तिने तिच्या खासगी जीवनाबद्दल भाष्य करताना तिचं लग्न म ोडल्याविषयी भाष्य केले.

जानेवारी २०२३ मध्ये तिचा साखरपुडा झालेला, अभिनेत्रीने या क्षणाचे काही खास फोटोही सोशल मीडियावर शेअर केलेले. तिने नुकतीच एक मुलाखत दिली, ज्यात तिने सांगितले की, ती आणि तिचा जोडीदार वेगळे झाले आहेत. आयुष्याच्या कोणत्याही वळणावर बहिणीची सोबत आहे याविषयी बोलताना तिने असे म्हटले की, 'सगळ्यांनाच माहितीये की माझा साखरपुडा झालेला आहे आणि लग्न होणार होतं. बऱ्याच लोकांना असंही वाटतं की, माझं लग्न झालंय. दुर्दैवाने ते आता नाही आहे. मी याआधी अनेक मुलाखतींमध्ये बोलले आहे की, लग्नासाठी मी किती उत्सुक आहे किंवा मला लग्न करायचं आहे. काही कारणास्तव आम्ही आता वेगळे झालो आहोत.' एका मुलाखतीत भूमिजा बोलत होती. भाऊबीजेनिमित्ताने भूमिजा आणि तिची बहीण प्रणाली या मुलाखतीत सहभागी झाल्या होत्या.

भूमिजा पुढे म्हणाली, 'हा माझ्या आयुष्यातला खूप महत्त्वाचा निर्णय होता, ज्याची मला खूप जास्त भीती वाटत होती. लोक काय म्हणतील, आता काय होईल याचा विचार येत होता. पण त्या सगळ्या परिस्थिती, जिथे मी म्हटलेलं की मला त्रास होतोय किंवा मी काहीतरी चुकीचा निर्णय घेतलाय... तेव्हा मी हे फक्त माझ्या ताईजवळ आणि मम्म ीपप्पांशी बोलले. दोन्ही बहिणींसोबत मी सर्वात आधी बोलले. त्यावेळी लोक काय म्हणतील हा मुद्दाच आला नाही, त्या दोघींचं म्हणणं होतं की, तू ठाम आहेस का, यामुळे त्रास नाही ना होणार? तर आम्ही तुझ्यासोबत आहोत. जर तुला त्रास होणार असेल तर तो आम्हाला बघवणार नाही, त्या म्हणाल्या की, त्यामुळे तू घे निर्णय. माझ्या आयुष्यातला हा खूप मोठा निर्णय होता, या सगळ्या प्रक्रियेत त्या माझ्यासोबत होत्या. आयुष्यातील खूप वाईट टप्पा होता तो.'

भूमिजाने असे म्हटले की, तिच्या बहिणींसोबतच्या संभाषणात ती चुकीची किंवा बरोबर असा मुद्दाच आला नाही. 'तुझा आनंद हा आमचा आनंद' असे तिच्या बहिणींनी म्हटल्याचे ती म्हणाली.

एसटी आगारात दर बुधवारी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन साजरा होणार...

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने दि. १५ जुलै २०२४ रोजी पासून प्रवाशांच्या समस्या, तक्रारी व सूचनांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरण होण्याच्या उद्देशाने प्रत्येक आगारात दर प्रत्येक बुधवारी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन आयोजित करण्यात येणार आहे. यापूर्वी हा दिन महिन्याच्या दर सोमवारी व शुक्रवारी आयोजित होत होता आता त्यात बदल करण्यात आला आहे. या उपक्रमात विभाग नियंत्रक आगारात जाऊन प्रवाशांच्या व रा.प. कर्मचाऱ्यांच्या समस्या, तक्रारी, सूचना ऐकून त्या तातडीने सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणार आहेत. त्यामुळे प्रवाशांचे समाधान होऊन प्रवासी सेवेचा दर्जा व गुणवत्ता वाढण्यास मदत होईल, असे एस.टी. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांनी व्यक्त केले आहे. राज्य परिवहन, बुलढाणा विभागातील आगारामध्ये हा दिन

साजरा करण्याकरीता महामंडळाने वेळापत्रक जाहीर केले आहे. या वेळापत्रकानुसार दि. २९ ऑक्टोबर रोजी बुलढाणा आगार, १२ नोव्हेंबर रोजी चिखली आगार, १९ नोव्हेंबर रोजी खामगाव, २६ नोव्हेंबर रोजी मेहकर, ३ डिसेंबर रोजी मलकापूर, १० डिसेंबर रोजी जळगाव आणि १७ डिसेंबर रोजी शेगाव येथे प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. या वेळापत्रकानुसार रा.प. आगारामध्ये सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार असून या वेळेत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालये आपल्या समस्या तक्रारी, सूचना लेखी स्वरुपात मांडु शकतात. तसेच दुपारी ३ ते ५ या वेळात कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार असून या वेळेत संघटना व रा.प.कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक बाबतीतील प्रश्न (रजा मंजुरी, कर्तव्यासंबंधी, वेळापत्रका संबंधी व प्रमादिय कारवाई) अशा तक्रारी लेखी स्वरुपात घेऊन तक्रारीचे किंवा समस्याचे तात्काळ निराकरण करण्यात येतील. जिल्ह्यातील सर्व राज्य परिवहन बस प्रवाशी व कामगार यांनी याचा लाभ घेऊन आपल्या समस्यांचे निराकरण करुन घ्यावे, असे रा.प. महामंडळ, बुलढाणा विभागामार्फत आवाहन करण्यात येत आहे.

डिजिटल व्यवहारांसाठी डाक विभागाची विशेष मोहीम...

प्रीमियम, पॉलिसी, दाव्यांची माहिती तत्काळ मिळणार ग्राहकांनी केवायसी दस्तऐवजांसह माहिती सादर करण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

भारतीय डाक विभागाच्या वतीने डाक जीवन विमा आणि ग्रामीण डाक जीवन विमा योजनेंतर्गत डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी दोन महिन्यांची विशेष मोहीम बुलढाणा विभागात १६ ऑक्टोबरपासून सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत सर्व सक्रिय पॉलिसीधारकांचे मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडी अद्ययावत करून व्यवहार प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि कार्यक्षम करण्याचा उद्देश ठेवण्यात आला आहे. पॉलिसीधारकांनी आपले अद्ययावत संपर्क तपशील दिल्यास त्यांना प्रीमियम भरपाई, पॉलिसी स्थिती, दावा प्रक्रिया यासंदर्भातील सर्व माहिती तत्काळ एसएमएस व ई-मेलद्वारे मिळणार आहे. ग्राहकांनी आपल्या जवळच्या मुख्य किंवा उप टपाल कार्यालयात भेट देऊन आवश्यक केवायसी दस्तऐवजांसह माहिती सादर करावी. ग्रामीण भागातील शाखा टपाल कार्यालयांमध्येही ही प्रक्रिया सुलभतेने पूर्ण होणार आहे. डिजिटलायझेशनच्या या उपक्रमामुळे डाक जीवन विमा सेवांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिक वापर होऊन ग्राहक सेवा दर्जा उंचावेल, असा विश्वास व्यक्त करत सर्व नागरिकांनी या मोहिमेत उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहन बुलढाणाचे डाक अधीक्षक गणेश आंभोरे यांनी केले आहे.

अवैध सावकारांकडील ७४ हेक्टर शेतजमीन शेतकऱ्यांना परत...

५५ प्रकरणांत गुन्हे दाखल ६५१ प्रकरणांची चौकशी पूर्ण

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियमातील कलमांनुसार जिल्ह्यातील ६९ प्रकरणातील अवैध सावकारांकडील ७४.२७ हेक्टर आर शेतजमिन शेतकऱ्यांना परत करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक डॉ. महेंद्र चव्हाण यांनी दिली आहे. बुलढाणा जिल्ह्यात अवैध सावकारांकडून होत असलेली पिळवणूक रोखण्यासाठी प्रशासनाकडून कडक कारवाई सुरू असून शेतकऱ्यांनी निर्भयपणे तक्रारी दाखल कराव्यात, असे आवाहनही त्यांनी केले आहे. दि. १९ ऑक्टोबर २०२५ रोजी ङ्कदैनिक पुण्यनगरीफ्मध्ये ङ्कङ्कसावकारी पाशात अडकलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी हडपणाऱ्या टोळ्या सक्रिय, चिखलीत गल्लीबाजार तेजीत, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अवैध सावकारांना बळफ्फ या मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध झाली होती. या बातमीचे खंडन करत जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने स्पष्ट केले की, अवैध सावकारी तक्रारींची दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही नियमितपणे करण्यात येते. शासन निर्णयानुसार, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ च्या अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. या समितीत जिल्हा पोलिस अधीक्षक सदस्य असून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था हे सदस्य सचिव आहेत. हा अधिनियम अंमलात आल्यापासून आतापर्यंत कलम १६ अंतर्गत ७७८ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ६५१ प्रकरणांची चौकशी पूर्ण करण्यात आली आहे. तसेच कलम १८(२) अंतर्गत ४०१ तक्रारी प्राप्त झालेल्या असून २७० तक्रारी निकाली काढल्या गेल्या आहेत, तर १३१ प्रकरणे प्रलंबित आहेत. या अधिनियमांतर्गत आतापर्यंत ६९ प्रकरणांत ७४.२७ हेक्टर शेतजमीन शेतकऱ्यांना परत करण्यात आली असून ५५ प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.अवैध सावकारांकडून पिळवणूक झाल्यास जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा किंवा संबंधित तालुक्यातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयांकडे तक्रार दाखल करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

गरिबांच्या घराघरात बुलढाणा जिल्हा सुतार समाज एकीकरण समितीच्या वतीने आनंदाचा शिधा वाटप

जनसंचलन/बुलढाणा

यंदाच्या दिवाळी सणानिमित्त जिल्ह्यातील गोरगरिब घराघरात आनंदाचा शिधा वाटप करण्यात आला आहे.बुलडाणा जिल्हा सुतार समाज एकीकरण समितीचे वतीने जिल्ह्यातील विधवा ,परितक्त्या, वयस्कर निराधार महिला व वंचीत घटकातील कुटुंबाची दिवाळी आनंदात साजरी व्हावी यासाठी किराणा सामानाचे किट वाटप करण्यात आले. एका महिन्याला पुरेल एवढे सामान मिळाल्यामुळे अनाथ , निराधार , वंचीत कुटुंबांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचे काम समाजातील प्रमुख मंडळीच्या सहकार्याने करण्यात आले. श्री. समाधान सुरोशे यांनी स्वतः २० किट व इतर समाजबांधवांचे वतीने ९ असे एकूण २९ किट वाटप करण्यात आले. दिवाळीचा आनंद अशा वंचीत घटकांसोबत घरोघरी जाऊन साजरा करण्याचे काम , बुलढाणा जिल्हा सुतार समाज एकीकरणचे जिल्हाध्यक्ष अनंतराव राऊत, समाधान सुरोशे ,सचिव . समाधान जंजाळकर , संजय राऊत , डॉ. विजय खोलाडे , गजानन जवरकर , संजय हातेकर यांनी केले. या उपक्रमाचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात येत आहे.

कराडमध्ये भाजपचा मास्टरस्ट्रोक, पृथ्वीराज चव्हाणांना धक्का, थेट जनतेतून नगराध्यक्ष झालेल्या नेत्याची सोडचिठ्ठी...

वृत्तसंस्था/ सातारा

सातारा : जनतेतून निवडून येत कराडच्या नगराध्यक्षा झालेल्या शारदा जाधव आपले सहकारी, आठ माजी नगरसेवकांसोबत भाजपचा झेंडा हाती धरणार आहेत. मंगळवारी २८ ऑक्टोबर रोजी मुंबईतील प्रदेश कार्यालयात त्या भाजपमध्ये प्रवेश करतील. नगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर भाजपचा हा मास्टरस्ट्रोक काँग्रेस नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासाठी धक्कादायक मानला जात आहे. कराड दक्षिणचे आमदार आणि भाजपचे सातारा जिल्हाध्यक्ष डॉ. अतुल भोसले यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षाच्या जास्तीत जास्त जागा निवडून आणण्यासाठी राजकीय गोळाबेरीज सुरु केली आहे. गेल्या काही दिवसात कराड आणि मलकापूरचे माजी नगरसेवक, तसेच ग्रामीण भागातील काँग्रेसच्या नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. आता पृथ्वीराज चव्हाण समर्थक कराडमधील जाधव गट भाजप प्रवेश करणार असल्याने भाजपची ताकद आणखी वाढणार आहे. शारदा जाधव यांनी २००१ मध्ये थेट जनतेतून निवडून येऊन पाच वर्ष कराडचं नगराध्यक्षपद भूषवलं होतं. त्यानंतर त्या बिनविरोध नगरसेविका झाल्या. २००९ ते २०११ या काळात नगरसेवकांमधून दुसऱ्यांदा अडीच वर्षांसाठी त्या नगराध्यक्षा झाल्या होत्या. सासरे दिवंगत ज्ञानदेव जाधव यांच्याकडून त्यांना पालिका राजकारणाचा वारसा आहे. त्यांचे दीर दिवंगत जयवंतराव जाधव हे देखील नगराध्यक्ष होते. गेली अनेक वर्षे शारदा जाधव आणि दुसरे दीर अरुण जाधव हे कराडच्या राजकारणात सक्रिय आहेत. १९९१-९५ चा अपवाद वगळता १९८५ पासून ४० वर्षे शारदा जाधव या कराड नगरपालिकेत नगरसेविका आहेत. या दरम्यान, दोनवेळा त्या नगराध्यक्ष होत्या.

शारदा जाधव यांचे दीर अरुण जाधव यांनी २००४ मधील विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीचे तत्कालीन आमदार बाळासाहेब पाटील यांना आव्हान दिले होते. अपक्ष म्हणून निवडणूक लढवताना अवघ्या काही हजार मतांच्या फरकाने पराभव झाल्याने अरुण जाधवांची आमदारकीची संधी थोडक्यात हुकली होती. राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) नेत्यांनी आधी जाधव गटाशी संपर्क साधला होता. पक्ष प्रवेशाच्या अनुषंगाने त्यांच्या दोन-तीन बैठकाही झाल्या होत्या. मात्र, नेमक्या कोणत्या कारणाने जाधव गटाचं राष्ट्रवादीशी जुळलं नाही, हे गुलदस्त्यातच आहे. मात्र, जाधव गटाला भाजपात आणण्यात आमदार अतुल भोसले यांना यश आलं. काही महिन्यांपासून भाजपामध्ये प्रवेशाचा धुमधडाका सुरू असल्याचं पाहायला मिळतंय. शिवसेना शिंदे गटातही काही जणांनी यापूर्वी प्रवेश केला आहे. मात्र काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्यास कुणी इच्छुक दिसेना. उलट या दोन्ही पक्षातून आऊट गोईंगच सुरू आहे.

शिंदेंकडे सूत्रं, पण दादा नाहीत मित्र;भाजपनं एनसीपी ला दूर लोटलं, मुहूर्तही ठरला...

वृत्तसंस्था/ पुणे

राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होतील. त्यासाठी महायुतीनं कंबर कसली आहे. सत्तेतील तिन्ही पक्षांसाठी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जोरदार इनकमिंग सुरु केलं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे मिनी विधानसभा म्हणून पाहिलं जात असल्यानं त्या प्रतिष्ठेच्या आहेत. भाजपनं २०२९ मध्ये होणाऱ्या निवडणुकांसाठी शत प्रतिशतचा नारा दिलेला आहे. त्यामुळे मित्रपक्षांसाठी धोका वाढलेला आहे. मुंबईत महायुती म्हणून लढू. ठाण्याबद्दलचा निर्णय एकनाथ शिंदे घेतील. पुणे, पिंपरी-चिंचवडमध्ये स्वबळावर लढू, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गेल्याच आठवड्यात अनौपचारिक गप्पा मारताना म्हणाले. त्यामुळे एकीकडे शिंदेंकडे सूत्रं सोपवली जात असताना दुसरीकडे अजित पवारांना दूर लोटण्याची तयारी भाजपनं सुरु केल्याची चर्चा आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसपासून विलगीकरणाची प्रक्रिया भाजपनं सुरु केलेली आहे. त्यासाठी महापालिका निवडणुकीचा मुहूर्त निश्चित झाल्यात जमा आहे. ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवडमध्ये २०१७ मध्ये महापालिकेच्या निवडणुका झाल्या. सगळीकडे भाजप स्वबळावर लढला. ठाण्यात एकनाथ शिंदेंच्या नेतृत्त्वात शिवसेनेनं १३१ पैकी ६४ जागा जिंकत एकहाती सत्ता मिळवली. तर भाजपची गाडी २३ वर अडकली. पुणे, पिंपरी-चिंचवडमध्ये मात्र परिस्थिती वेगळी होती. पुण्यात भाजपनं १६२ पैकी ९७ जागा जिंकल्या. भाजपनं २६ वरुन ९७ पर्यंत झेप घेतली. तर सत्तेत असणारी राष्ट्रवादी काँग्रेस ५१ वरुन ३९ वर घसरली. पुणे महापालिका भाजपनं स्वबळावर जिंकलेली आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेससोबत युती करण्याची भाजपच्या स्थानिक नेत्यांची इच्छा नाही. सध्याच्या घडीला पुणे, पिंपरी चिंचवडमध्ये भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसची ६०-४० अशी ताकद आहे. मागील निवडणुकीत निवडून आलेले, क्रमांक दोनवर राहिलेले आणि अन्य पक्षातून आलेले अशी १२५ जणांची यादी भाजपकडे तयार आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादी सोबत युती केल्यास भाजपला अनेक ठिकाणी फटका बसू शकतो. अनेक इच्छुक बंडखोरी करु शकतात. त्याचा फायदा महाविकास आघाडीला होऊ शकतो. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर ३२ नगरसेवकांनी अजित पवारांना साथ दिली. तर १० जण शरद पवारांसोबत राहिले. अजित पवारांसोबत युती झाल्यास भाजपमध्ये मोठी बंडाळी होऊ शकते. तो धोका भाजपला पत्करायचा नाही. अनेक प्रभागांमध्ये भाजपकडे २-२ तगडे उमेदवार आहेत. त्यामुळे भाजपनं १०० ते १२० जागा जिंकण्याचं लक्ष ठेवलं आहे. पुणे महापालिकेची निवडणूक अजित पवारांनी सोडून दिल्यात जमा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस सगळ्या जागा लढवेल का याबद्दल शंका आहे. ४० ते ५० जागा निवडून आणण्याचं लक्ष्य त्यांच्याकडून ठेवलं जाईल. २०१४ मध्ये पुणे शहरात अजित पवारांना एकही आमदार निवडून आणता आला नाही. २०१९

मध्ये त्यांना भोपळा फोडता आला. २०१७ मध्ये पुणे महापालिका त्यांच्या हातून गेली. पिंपरी चिंचवडमध्येही हीच परिस्थिती आहे. पुणे, पिंपरी-चिंचवडमधील सद्यस्थिती पाहता अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची अवस्था बिकट आहे. महापालिका निवडणुकांमध्ये राष्ट्रवादीची स्वबळावर लढून सत्ता येईल, अशी स्थिती नाही. भाजपला त्यांच्यासोबत युती करायची नाही. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या अडचणी वाढल्या आहेत. कोणत्याही नेत्याला दिर्घकालीन राजकारण करताना आपला बालेकिल्ला तयार करावा लागतो. अजित पवारांच्या हातून त्यांचा बालेकिल्ला २०१७ मध्येच गेला. आता भाजप सोबत सत्तेत असल्यानं त्यांचं राजकारण सुरु आहे. पण भाजपनं २०२९ च्या दृष्टीनं सुरु केलेल्या हालचाली पाहता अजित पवारांचे बुरे दिन सुरु झाल्याची चर्चा आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२७७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८